# विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकिय ईमारत, गाळा क्र.39, उस्मानाबाद-413501 दु.क्र.(02472-223408) फॅक्स क्र.223907

पत्र

विषय- Proposal for diversion of 5.8535 Ha Forest Area (2.8943) Ha in Osmanabad Forest Division ) for proposed Greenfield Railway line between Solapur-Tuljapur-Osmanabad (Total Length of 84.439 Km) passing through Solapur and Osmanabad district in the State of Maharashtra.

जा.क्र.अ/ वसंअ/ 1891 /2022-23.

उस्मानाबाद.413501. दिनांक 22/8/2022.

प्रति,

उप मुख्य अभियंता (निर्माण)
मध्य रेल भुसावळ
जि.जळगांव

संदर्भ-आपलेकडील पत्र क्रमांक Dy.CE/(C)BSL-II/DO/SUR-UMD/LA/दिनांक 21.07.2022

उपरोक्त विषयास अनुसरुन उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल भुसावळ यांचेकडुन सोलापुर-तुळजापुर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी तुळजापुर तालुक्यातील 2.8943 हेक्टर वनजमीन भारतीय वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्तावास या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदरील प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळुण आलेल्या आहेत.

1.सदर रेल्वे प्रकल्पासाठी पर्यायी मार्गाचा नकाशा किंवा त्याची KML फाईल सोबत जोडावी.

2.प्रस्तावमधील प्रमाणपत्र क्रमांक 16,17,18,34,35,36,37,38,39,41,42,45,46 व 52 ते 55 इ. प्रमाणपत्र स्वतंत्र पाणावर देणे आवश्यक आहे.

3.वनसदृष्य क्षेत्राची Identified Forest यादी अँगल भाषेत देण्यात यावी.

4. प्रस्तावमध्ये रेल्वे प्रकल्पाची Project Not जोडण्यात यावी.

5.सदर रेल्वे प्रकल्पाची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी आदेशाची प्रत जोडलेली दिसुन येत नाही.

6. रेल्वे प्रकल्प मंजुर करणेत आलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडण्यात यावी.

7.सदर रेल्वे प्रकल्पासाठी Privesh प्रणालीवर वनजमीन वळतीकरण होत असलेल्या क्षेत्राचे KML फाईलवर वन जमीन वळतीकरण क्षेत्र 2.73 हे दिसुन येते. परंतु हार्ड कॉपीमध्ये 2.8943 हे.क्षेत्र आवश्यक असल्याचे नमुद आहे. सदर तफावती बाबत अर्थबोध होत नाही.

8.सदर रेल्वे प्रकल्पासाठी Privesh प्रणालीवर वनजमीन वळतीकरण होत असलेल्या मौजे तुळजापुर गावाचे क्षेत्राची KML फाईल अपालोड करणेत आल्याचे दिसुन येत आहे. परंतु मौजे सांगवी मार्डी या गावाची KML फाईल अपालोड केल्याचे दिसुन येत नाही.

9. प्रस्तावित रेल्वे प्रकल्पाची लाईन ही उस्मानाबाद जिल्हयातील वन्यजिव अभयारण्या पासुनचे किती अंतरावरून जात आहे त्या बाबत Topo sheet, गाव नकाशावर दर्शवुन जियो रेफरन्स नकाशा व सॅटेलाईट इमेजरी नकाशावर मार्क करुन सादर करण्यात यावा.

10. प्रस्तावा संबंधित सर्व माहिती प्रमाणपत्रे व सर्व नकाशे ,टोपोशिट व केएमएल फाईल सॉफट कॉपीसह सीडीमध्ये सादर केलेले दिसुन येत नाही.

11.सदर प्रस्तावासोबत Cronology Event मध्ये परिपुर्ण माहिती भरुन सादर केलेली दिसुन येत नाही.

12.प्रस्तावासोबत वन जमिन मागणी मौजे तुळजापुर व सांगवी मार्डी गावातील क्षेत्राचे 7/12 इंग्लिश मधील जोडण्यात आलेला नाही.

13. प्रस्तावित रेल्वे प्रकल्पासाठी बाधित होत असलेल्या वनक्षेत्राच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी दुप्पट अवनत क्षेत्र उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

14. प्रस्तावित रेल्वे प्रकल्पाच्या अनुषंगाने बाधीत होत असलेल्या क्षेत्राच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या क्षेत्राचे जसे की, गाव नकाशा सर्व्हे ऑफ इंडिया कडील टोपो शिट, सॅटेलाईट इमेजरी व KML फाईलसह सॉफट व हार्ड कॉपीसह सादर करणे बंधनकारक आहे.

15.सदर प्रस्तावाचे अनुषंगाने अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी वनहक्काची मान्यता अधिनियम 2006 नुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडील FRA प्रमाणपत्र फॉर्म नं.1 विहीत नमुन्यात प्राप्त करुन घेवुन प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

तसेच या कार्यालयास सादर करणेत आलेला प्रस्ताव हा एकच प्रतीत सादर करण्यात आलेला आहे. उपरोक्त नमुद 1 ते 15 त्रुटीची पुर्तता करुन परिपुर्ण प्रस्ताव 7 प्रतीत सॉफ्ट व हार्ड कॉपीत सीडीसह या कार्यालयास सादर करणेत यावा जेणेकरुन या कार्यालयाकडुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे सोईचे होईल. सदरील मुळ प्रस्ताव हा अपुर्ण व अत्यंत त्रोटक स्वरुपाचा असल्याने यासोबत ऑनलाईनं व ऑफलाईन परत करणेत येत आहे.

सहपत्र-वरील प्रमाणे.

(श्रीमती.वृषाली बी.तांबे )
विभागीय वन अधिकारी
उस्मानाबाद.

प्रतिलिपी -मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केद्रस्थ अधिकारी म.रा.नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी -मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) वनवृत्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.